**कृपया प्रसिध्दीसाठी** **3 नोव्हेंबर 2008**

**भाजपा नेते व माजी केंद्रिय मंत्री श्री.राम नाईक यांनी 3 नोव्हेंबर 2008 रोजी**
**मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन**

***जनसंपर्कासाठी राम नाईक यांचे संकेतस्थळ कार्यान्वित***

**मुंबई, सोमवार** : राजकारणाच्या माध्यमातून काम करणारा कार्यकर्ता जनतेला सदैव उपलब्ध असला पाहिजे या भूमिकेतून आधुनिक काळाशी सुसंगत त्वरीत जनसंपर्कासाठी भाजपा नेते व माजी केंद्रिय मंत्री श्री.राम नाईक यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदमध्ये www.ramnaik.com हे आपले संकेतस्थळ (वेबसाइट) कार्यान्वित केले.

यासंबंधीची आपली भूमिका सांगताना श्री.राम नाईक म्हणाले,"जनप्रतिनिधी - जनसेवक म्हणून तीन दशकांहून अधिक काळ काम करीत असताना जनतेशी थेट संपर्क साधण्याबद्दल मी सतत जागरुक राहण्याचा प्रयत्न केला आहे. जनसंपर्क कार्यालय, वार्षिक अहवाल आणि विविध राजकीय - सामाजिक कार्यक्रम यांच्या माध्यमातून मी जनतेला उपलब्ध राहण्याचा प्रयत्न करतो. तथापि आता काळ बदलला आहे. एकीकडे विविध व्यवधानांमुळे प्रत्यक्ष संपर्क साधणे शक्य होत नसले, तरी इंटरनेटच्या माध्यमातून लोक एकमेकांशी सतत संपर्क ठेवण्याचा प्रयत्न करतात. व्यक्तिगत सोयीच्या वेळेनुसार हा संपर्क ठेवता येतो. त्यामुळेच मीही पूरक साधन म्हणून संकेतस्थळाच्या माध्यमातून आता नागरिकांशी संवाद साधण्याचा निर्णय घेतना आहे."

श्री.नाईक यांच्या संकेतस्थळाबद्दल माहिती देताना भाजपा - महाराष्ट्रच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाचे संयोजक श्री.विनीत गोयंका म्हणाले,"गुणवत्तेच्या दृष्टीने इतर राजकीय नेत्यांच्या संकेतस्थळांशी तुलना करावी असे हे संकेतस्थळ आहे. श्री.राम नाईक यांच्या संकेतस्थळाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संकेतस्थळाला भेट देणा-याचे एका ध्वनिचित्रफितीद्वारे स्वतः श्री.नाईक स्वागत करतात. एवढेच नव्हे तर इंग्लिश व हिंदी या दोन्ही भाषेत हे स्वागत आहे. सुरुवातीला इंग्लिश हीच इंटरनेटची भाषा होती. परंतु आता वेगवेगळया भाषांद्वारेही इंटरनेटवर संवाद साधता येतो हे लक्षात घेऊन हिंदी,मराठी,गुजराती यांचाही काही ठिकाणी इंग्लिश एवढयाच प्रभावीपणे उपयोग करण्यात आला आहे."

श्री.राम नाईक यांच्या प्रदीर्घ राजकीय - सामाजिक कारकिर्दीचा चित्रमय आढावा या संकेतस्थळाच्या माध्यमातून घेता येईल. संसदेत वंदे मातरम् गायनास प्रारंभ, बॉम्बे - बंबई ऐवजी मुंबई, खासदार निधी, स्तनपान प्रोत्साहन विधेयक, आदी श्री.राम नाईक यांनी केलेल्या विशेष महत्त्वाच्या कामांचीही यात थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर वेळोवेळी श्री.नाईक यांनी प्रसिध्द केलेल्या पुस्तकांपैकी काही महत्त्वाची पुस्तके, वार्षिक अहवाल संकेतस्थळावर वाचता येतील, तर काहीं पुस्तके मागणीनुसार उपलब्ध करुन दिली जातील.

या संकेतस्थळाच्या माध्यमातून श्री.राम नाईक यांची माहिती तर मिळेलच पण त्याच बरोबर भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेपासूनच्या अनेक घडामोंडीचा मागोवाही घेता येईल. भारतीय जनसंघ, आणीबाणी नंतरच्या दोन वर्षांतील जनता पार्टी यांच्या कार्यक्रमांचा तसेच रेल्वे, गृह, पेट्रोलियम या खात्यांचे मंत्री म्हणून केलेल्या कामांची माहितीदेखील यात आहे. मान्यवरांची दुर्मिळ छायचित्रे जशी या संकेतस्थळावर आहेत तशीच स्वतः श्री.नाईक यांचीही दुर्मिळ छायचित्रे येथे बघायला मिळतील. प्रत्येक छायचित्र एकेका राजकीय - सामाजिक घटनेचे साक्षीदार असल्याने त्याची माहितीही देण्यात आली आहे.

सदर संकेतस्थळ अद्ययावत राखण्याचा आपला सतत प्रयत्न राहील असेही श्री.राम नाईक यांनी पत्रकार परिषदेत आवर्जून सांगितले.

**(कार्यालय सचिव)**